पुण्य नगरी



# फसवणूक करणाऱ्या लिंकपासून सावधगिरी बाळगा

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सायबर सुरक्षा वॉरिअर क्लबच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत विद्यापीठातील स्वयंसेवकांनी विविध सामाजिक घटकांना सायबर सुरक्षेविषयी जागरूक करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये वैष्णवी पाटील आणि स्नेहल पाटील या सायबर सुरक्षा स्वयंसेवकांनी आंदोलनासाठी जमलेल्या आशा स्वयंसेवक महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. त्यांनी महिलांना मोबाईल फोन वापरताना घ्यावयाची काळजी, फसवणूक करणाऱ्या लिंकपासून सावधगिरी, सोशल मीडियावरची सुरक्षितता, ओटीपी आणि पासवर्डविषयी महत्त्व याबाबत सविस्तर आणि साध्या भाषेत माहिती दिली. यावेळी महिलांनी सायबर सुरक्षेबाबत विचारलेले प्रश्न आणि स्वयंसेवकांनी दिलेल्या उत्तरांमुळे उपस्थितांमध्ये जनजागृती करण्यात आली.

Jalgaon Edition
Jul 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com